
## शंभू गणपुले

# संतांची वाडी



# संतांची वाडी

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# संतांची वाडी

(स्वतंत्र नाटक)

## लेखक - शंभू गणपुले

ई साहित्य प्रतिष्ठान

# लेखक : शंभू गणपुले

" योगिनी", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

संपर्क   :जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038   020-25384472, 9822439492

jayant. karandikar@gmail. com



## या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841


APP : https://play.
google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन : ८ ऑक्टोबर २०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.



लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले

वय     : आठ्ठ्याहत्तर

शिक्षण: बी. ए. , एल. एल. बी. , हिंदी विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड, सध्या लेखन,

प्रकाशित लेखन:  "ताओ उपनिषद" ,

कथा-कविता संग्रह -२,

अंतरंग,  एक मोकाट वारं,  किती तुज समजावू सांग, असं पण होऊ शकतं

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळ्या संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास:  "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

©सर्व हक्क  श्री. जयंत करंदिकर यांचे स्वाधीन.

जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038   020-25384472, 9822439492




शंभू गणपुले


यांची


ई साहित्य


प्रतिष्ठानतर्फे


प्रकाशित


झालेली पुस्तके






# अर्पण पत्रिका

’ज्यानी माझ्यामधे लेख़नाची उर्मी निर्माण केली आणि माझ्याकडून काही लेखन करून घेतले ते माझे आजोबा   -माझ्या आईचे वडील- विद्यावाचस्पती श्री कृष्णाजी केशव कोल्हटकर, यांच्या स्मृतीस माझे सर्व लेखन मी समर्पित करत आहे.

-- शंभू गणपुले

# संतांची वाडी

## (एक प्रयोगक्षम एकांकिका)

## लेखक - शंभू गणपुले

**दृश्य १** - (एका खेड्याजवळच्या छोट्या टेकडीवरचा ‘संकट मोचन’ महाराजांचा मठ. मठाच्या अर्ध्या भागात एक छोटा चौथरा आहे. चौथऱ्यावर एक-सव्वा फ्ट उंचीची संकट मोचन महाराजांची मूर्ती बसवलेली आहे. त्या मूर्तीचे नाक, कान खंडीत झालेले आहेत. मूर्तीच्या पायावर २/४ रान फ्लं आणि मूर्तीच्या गळयात तसल्याच फ्लांचा लुकडा हार घातलेला आहे. मूर्ती समोर दोन उदबत्त्या जळत आहेत. मूर्ती समोर बसून सत्तरी उलटलेला पुजारी डोळे मिटून जप माळ ओढत बसला आहे. त्याच्या उजव्या हाताशी पाणी भरलेलं तांब्या, भांडे, पळी-पंचपात्र ठेवले आहे. चाथऱ्यापासून थोड्या अंतरावर डाव्या उजव्या बाजूला दोन लाकडी फ्म्स दिसत आहेत. एकेकाळी तिथं मठात यायची जायची दारं असावीत. प्रकाश येतो. डावीकडच्या दारातून दोन मध्यम वयाचे गांवकरी मठात प्रवेश करतात. मूर्तीचे दर्शन घेतात. प्रदक्षिणा घालतात. पुजाऱ्यासमोर जाऊन हात पुढं करतात. पुजारी पळी-पळी तीर्थ त्याच्या हातावर टाकतो. तीर्थ पिऊन दोघंजणं पुजाऱ्याच्या पाया पडतात आणि नंतर डाव्या चौकटीच्या समोर बसतात. क्षणभरांत उजवी कडच्या दारातून एक मुलगी प्रवेश करते. मुलीचं नाव सुमन. तिला बघून दोन्ही गांवकरी सावरून बसतात. मुलीचं वय २०/२१. नीटनेटके कपडे, साडी नेसलेली. सुमन दोन्ही गावकऱ्यांच्या जवळ येते.)

सुमन - तात्या, बापू, मला तुमच्याशी थोडं बोलायचं आहे. मी पुजारी काकांचे आशिर्वाद घेऊन येते. तोपर्यंत जाऊ नका.

तात्या/बापू - थांबतो जी.

*(सुमन मूर्तीला एक प्रदक्षिणा घालते. पुजाऱ्याजवळ येऊन मूर्तीपुढं डोकं टेकते, पुजाऱ्या पुढं हात करते. पुजारी तिच्या हातावर पळीभर तीर्थ घालतो. ते पिऊन टाकून सुमन पुजाऱ्यांच्या पाया पडते. पुजारी आशिर्वाद देतो.)*

पुजारी - आयुष्यमान भव, यशस्वी हो पोरी. महाराजांच्या कृपेनं तुझ्या डोक्यावर लवकर अक्षता पडोत. शेजारच्या गावातली पाटील मंडळी दोन दिवसांपूर्वी तुला बघून गेली. त्यांच्याकडून काही निरोप आला कां?

सुमन - त्यांच्याकडून होकार येण्यासारखं, पाटलीण होण्यासारखं माझं रूप तरी आहे कां काका? किरकोळ शरीर यष्टी आणि नको तितकं-बी.एड.पर्यंत शिक्षण. शिवाय डोक्यावर आई-बापाचं छत्र नाही. अशा मुलीला कोण बायको करून घेणार?

पुजारी - अशा गोष्टी हल्ली लग्नाच्या आड येत नाहीत. गोरी पान आहेस, नाकी डोळी ठसठशीत आहेस.... मी तुला एक मंत्र-जप दिला होता. तो जप नेमानं करतीयस ना?

सुमन - हा काका. झोपायच्या आधी पांच माळा ओढते.

पुजारी - छान! महाराजांची लवकरच कृपा होईल तुझ्यावर. पाटलांच्या स्थळापेक्षा चांगलं स्थळ मिळेल तुला. सुशिक्षित, चांगल्या घराण्यातला मुलगा, तुला मागणी घालून, घेऊन जाईल त्याच्या गांवी.

सुमन - काही तरीच काय काका आणि मी बरी जाईन त्याच्या बरोबर, माझी शाळा सोडून.

पुजारी - कळेलच काही दिवसात........... बरं कलेक्टर कचेरीत काय झालं? शाळेच्या इमारतीसाठी ग्रँट वाढवून देणार आहेत का?

सुमन - पन्नास टक्के आशा आहे. शाळेच्या इमारतीचं किती बांधकाम झालं आहे त्याची पाहणी करण्यासाठी एक अधिकारी पाठवीन, असं म्हणालेत असिस्टंट कलेक्टर.

पुजारी - हं. तात्या आणि बापूंना कां बसवून ठेवलंयस?

सुमन - अगोबाई, बोलण्याच्या नादात विसरूनच गेले होते. एक माळ जप संपवते आणि मग बोलते त्यांच्याशी.

*(सुमन बसते. जप सुरू करते.)*

तात्या - दागं काय गुलू गुलू बोलत व्हते, कुनास ठाव.

बापू - आरं गप् बस. पुजारी काका बाईस्नी मुलगी मानत्यात. तू आपलं हवा-पान्याचं बोलत जा.

तात्या - त्ये बोलनारच होतो. बापू, आखाड संपत आला. पावसानं कुटं दडी मारलिया कुनास ठाव.

बापू - कशाला फिकीर करत्यास.

तात्या - फिकीर करूं नको तर काय करूं? वावरात जोंधळा पेरलाय. दोन दिवांत पाऊस सुरू झाला न्हाई तर पेरलेलं बी तापल्या माती खाली करपून जाईल.

बापू - आपलं म्हाराज हैत ना आपल्या पाठीशी (दोघं हात जोडून महाराजांच्या मूर्तीला नमस्कार करतात.) तू नगं काळजी करूस. समदं ठीक ठाक हुईल.

*(त्याचवेळी सुमन दोघांच्या जवळ येते. दोघं उभं राहण्याचा प्रयत्न करतात.)*

सुमन - बसा, बसा!..... तात्या तुमचा श्रीपती चार दिवस शाळेत कां आला नाही?

तात्या - पेरणीची कामं चालू व्होती जी.

सुमन - मृग नक्षत्र केव्हा लागणार, पेरण्या केव्हा चालू कराव्यात ते पुजारी काका सांगतात सगळ्यांना. त्या आधीच पेरण्या सुरूं केल्यात?

तात्या - चुकलं जी.

सुमन - आम्ही मुलांच्या डोक्यांत चांगले विचार पेरतो. श्रीपतीचं चार दिवस नुकसान झालं का नाही? बापू, शांता काकी काल संध्याकाळी मिटींगला कां आल्या नाहीत.

बापू - काय सांगू बाई, सुनेनं उच्छाद मांडलाय निसता.

सुमन - आता काय झालं? सून मुलगा वेगळे राहतायत ना?

बापू - येगळे म्हंजीऽऽ, आमच्या घराला लागून दोन खोल्या बांधून लेकाला दिल्या. नवरा-बायको सा म्हैंन तिथं ऱ्हायलं. नंतर सटवीला नखरं सुचाया लागलं. आमच्या घरात अंधारच हाय; तुमच्या घरात वारा खेळतोय, पन आमच्या घरात झुळूक पन येत न्हाई; देवाकडं येणारी जानारी मानसं आमच्या घरातच डोकावत्यात. येक ना दोन, सुनेची गाऱ्हानी संपतच नव्हती.

सुमन - अगोबाई, मग?

बापू - मंग काय, हिडकचं सामान तिकडं, तिकडचं सामान हिकडं. असं तीनदा झालं. सामानाची हालवाहलव माज्या कारभारनीनच करायची. मग बसत्ये कंबर धरून.

सुमन - तुमचा मुलगा बायकोला समजावत नाही?

बापू - येकदोनदा समजावलं. पन बायको ऐकत न्हाई म्हटल्यावर त्यानं काल काठी काढली, आन् बदडायला सुरूवात केली. तुमची काकी मधि पडली. दोन रट्टे तिच्याबी कमरत बसले. आता बसलिया कमर शेकत.

सुमन - बापू, तुमच्या सुनेला माझ्याकडं पाठवून द्या. बघू, शाळेच्या कामात रमत्येत कां. शाळा तिला पन्नास साठ रूपये पगार पण देईल.

बापू - लई उपकार होतील माझ्यावर *(सुमनच्या पुढं डोकं टेकतो.)*

सुमन - बापू, काय करता हे? हात जोडायचे, डोकं टेकायचं ते महाराजांच्या आणि पुजारी काकांच्या पायावर.

बापू - व्हय्. व्हय.

*(बापू आणि तात्या लगबगीनं मूर्तीजवळ जातात. डोकं टेकतात. नंतर पुजारी काकांच्या पुढं हात करतात. पुजारी काका दोघांच्या हातावर तीर्थ देतो. दोघं पाया पडतात. पुजारी आशिर्वाद देतो.)*

पुजारी - तुमच्या दोघांच्या मनातल्या इच्छा आकांक्षा महाराजांच्या कृपेनं पूर्ण होवोत.

*(क्षणभर दृश्य स्थिर. नंतर हळू हळू अंधार होत जातो.)*

**दृश्य - २**

*(सकाळ झाल्याचे संकेत. तात्या, बापू, सुमन आणि इतर २/३ गावकरी हातात अक्षता घेऊन उभे आहेत. पुजारी सगळ्यांच्या पुढे आहे. हळू हळू प्रकाश येतो.)*

पुजारी - गतं पापं, गतं दुःख, गतं दारिद्र मेवच, आगता सुख संपत्ती, पुण्योहम् तव दर्शनात्!

*(पुजारी एकेकाच्या हातातल्या अक्षता गोळा करून मूर्तीच्या पायावर वाहतो. स्वतःच्या जागेवर बसतो. एक एक जण मूर्तीच्या पायाला हात लावून आणि पुजारी काकाकडून तीर्थ घेऊन निघून जातो. सुमन प्रदक्षिणा सुरू करते. पुजारी देवाच्या पाया जवळची जप माळ उचलून जप सुरु करतो. क्षणभरानं एक कॉलेज कुमार धापा टाकत प्रवेश करतो. त्याचे कपडे, वागणं, बोलणं आधुनिक काळाला शोभेल असंच आहे. याचं नांव समीर पाटील. वय २३/२४, समीर मठाचं निरिक्षण करतो. नंतर)*

समीर - च्यायला, हे महाराज लोक डोंगर कपारीत, खबदाडात येवून कां राहतात कुणास ठाऊक? (थोडं पुजाऱ्याजवळ जाऊन) म्हातार बाबा, संकट माचन महाराजांचा मठ हाच कां?

*(पुजारी न बोलतां वर बोट दाखवतो. समीर वर बघतो.)*

समीर - हां. संकट मोचन महाराजांचा मठ असं लिहीलं आहे खरं. महाराज कुठं असतात सध्या?

*(पुजारी पुन्हा वर बोट दाखवतो.)*

समीर - अच्छा, महाराज वर बसतात कां, मग मी वर जाऊन महाराजांना भेटून येतो. वर जाण्याचा जिना मागच्या बाजूनं आहे ना?(पुजारी हसतो.) हसायला काय झालं.

पुजारी - सांगतो (पळीभर तीर्थ पुढं करतो.) हे तीर्थ घे. शांत हो. मग सांगतो सगळं.

*(पुजारी पळीभर तीर्थ समीरच्या हातावर टाकतो. समीरच्या हातावरून निम्म तीर्थ खाली सांडतं. पुजारी पटकन खांद्यावरचा पंचा खाली सांडलेल्या तीर्थावर टाकतो. समीर हातावरलं तीर्थ चाटून टाकतो आणि पँटला हात पुसतो. पुजारी हसतो.)*

समीर - हसायला काय झालं?

पुजारी - ते नंतर सांगतो. तुझं नांव काय, कुठून आलायस.

समीर - माझं नांव समोर पाटील, मी साताऱ्याहून आलोय्.

पुजारी - महाराजांचं बोलावणं आलं होतं?

समीर - तुम्ही निमंत्रण पाठवता लोकांना?

पुजारी - नाही. तशी पद्धत नाही या मठाची.

समीर - मग नसत्या चौकशा करू नका.

पुजारी - या वाडीतले किंवा आजूबाजूच्या वस्त्यातले भाविक लोक सोडले तर इतर सुशिक्षित लोक या मठाकडे वळत नाहीत. तू अचानक या देवस्थानाकडं कां वळलास ते कळलं तर तुला मार्गदर्शन करता येईल म्हणून सगळ्या चौकशा.

समीर - ठीक आहे. सगळं सांगतो. म्हणजे साधारण पंधरा दिवसांपूर्वी रात्री झोपलो असतांना मला स्वप्नात नाक, कान तुटलेली, एक दगडी मूर्ती दिसली. मी घाबरून ओरडत उठलो.

पुजारी - यालाच आम्ही महाराजांचे निमंत्रण म्हणतो.

समीर - तुमचंच घोडं पुढं दामटू नका. मी सांगतो ते ऐकून घ्या..... तर भास झाला असेल असं समजून, पाणी पिऊन मी झोपी गेलो. माझी बी.टेक्.ची फायनलचो परिक्षा चालू होती. शेवटचा पेपर संपल्यानंतर, मित्रांबरोबर सिनेमा बघून, घरी येवून झोपलो.

स्वप्नांत पुन्हा तीच मूर्ती आणि ओरडत उठणं! डॅड, मम्मी, मी आम्ही सगळेच घाबरून गेलो. मग मात्र डॅडींनी सातारच्या कर्वे गुरूजींचा सल्ला घेतला.

पुजारी - कर्वे गुरूजी, निष्णात ज्योतिषी पण आहेत. काय सल्ला दिला त्यांनी?

समीर - म्हणाले, ''साताऱ्यापासून तीस-पस्तीस किलोमीटरवर वाडी नावाचं खेडं आहे. तिथे एका टेकडीवर 'संकट मोचन' महाराजांचा मठ आहे. तिथं जाऊन मंदिराला दहा प्रदक्षिणा आणि मठातल्या महाराजांच्या मूर्ती समोर बसून 'श्री स्वामी समर्थ' असा दहा माळा जप कर. अशी सेवा आठ दिवस कर. ते महाराजच तुला पुढचा मार्ग दाखवतील.'' महाराज, मंदिराला प्रदक्षिणा, जप-तप या गोष्टीवर माझा विश्वास नाही. पण डॅडी, मम्मीच्या आग्रहा खातर.......

पुजारी - आई, वडिलांच्या आग्रहा खातर असो, पण सेवेचा फायदा शेवटी तुलाच मिळणार आहे. बरं, तू साताऱ्यातून रोज ये-जा करणार कां या गावांतच राहणार?

समीर - च्यायला, या भिकार गावांत आरामत राहण्यासारखं हॉटेल तरी आहे का?

पुजारी - हॉटेल नाही. पण गावच्या पाटलांनी 'भक्त-निवास' सुरू केलं आहे. तिथं सगळी सोय आहे.

समीर - पाटीलकीच्या जोडीला हा निवासाचा धंदा चांगला आहे. नको, मी रोज अप्-डाऊन करत जाईन.

पुजारी - ठिक आहे. कर्वे गुरूजींनी तुला मंदिराला दहा प्रदक्षिणा घालायला सांगितल्या आहेत का मूर्तीला?

समीर - मंदिराला.

पुजारी - मंदिराला एक प्रदक्षिणा घालायची म्हणजे एक बाजूनं अर्धी टेकडी उतरायची आणि दुसऱ्या बाजूनं अर्धी टेकडी चढायची. असं दहा वेळा करायचं. तू तरूण आहेस. तू वीस मिनिटांत एक प्रदक्षिणा केलीस तरी दहा प्रदक्षिणा घालायला तुला तीन तास वीस मिनिटं आणि दहा माळा जप करायला चाळीस मिनिटं म्हणजे चार तास मठात घालवाव लागतील.

समीर - काय? (कपाळावर हात मारून घेतो. क्षणभरानं दोन्ही दारातून वाकून बघतो.) भटजी बुवा, प्रदक्षिणा घालण्याची वाट चांगली मळलेली आहे. त्या वाटेवरनं मोटार सायकल सहज चालवता येईल.

पुजारी - म्हणजे, मोटार सायकलनं प्रदक्षिणा घालणार तू? (स्तिमित होवून आपल्या जागेवर बसकण मारतो) कमाल आहे तुम्हा तरूण लोकांची!

समीर - कमाल कसली त्यात? पायानं चालतच प्रदक्षिणा केली पाहिजे असं कुठल्या ग्रंथात लिहीलं आहे का? आणि मी म्हणतो तसं केलं तरच दोन-तीन तास वाचतील.

पुजारी - धन्य आहे तुम्हा तरूण मंडळींची!

*(त्याचवेळी समीरच्या गालावर थप्पड मारल्याचा आवाज येतो. समीर गाल चोळू लागतो.)*

समीर - एऽ म्हाताऱ्या, माझ्या थोबाडीत मारलीस?

पुजारी - कुणी, मी? माझा हात इतका लांब कसा पोहोचणार बाळा.

समीर - (तावातावानं पुजाऱ्याजवळ येतो.) खोटं बोलू नको. पांच दहा रूपये हवे असतोल तर तसं सांग. (खिशातून पैसे काढतो) घे?

पुजारी - तुझे पैसे तुला लखलाभ असो. मारून मुटकून भक्ताकडून पैसे उकळले असते तर महाराजांनी मला एक दिवसही इथं बसू दिलं नसतं.

समीर - एऽऽ, म्हाताऱ्या माझ्या थोबाडीत मारलीस. ते राहिलं बाजूला आणि वर सारवासारवी करतोयस?

पुजारी - सारवासारवी नाही. खरं तेच सांगतो आहे. या मठात नकारात्मक विचार करणाऱ्याला अशीच शिक्षा करतात महाराज.

समीर - एऽऽ थेरड्या, या मठाची प्रसिद्धी व्हावी, मठा भोवती गूढ निर्माण व्हावं म्हणून वाटेल त्या गोष्टी रचून सांगतोयस्? तुझं खरं रूप जगाला पटवूनच देतो. ऊठऽऽ ऊठऽऽ!

*(पुजाऱ्याला बखोटीला धरून उभं करतो. मारण्यासाठी हात उगारतो. त्याचवेळी डाव्या दारातनं सुमन तीरासारखी प्रवेश करते आणि समीरचा हात वरच्यावर पकडते.)*

सुमन - ओ मिस्टर, कोण असाल ते, पुजारी काकांवर हात उगारतांना कणभर सुद्धा लाज वाटली नाही तुम्हाला? त्यांच वय काय, तुमचं वय काय? आजपर्यंत कुणीही असं धाडस केलं नाही. आणि शक्तीचा एवढा माज चढला असेल तर कुस्तीच्या दंगलीत जावून दाखवा तुमची ताकद. महाराज आणि पुजारी काका ही वाडीतल्या लोकांची

श्रद्धा स्थानं आहेत. त्यांना मारहाण केलेली कुणोही खपवून घेणार नाही. आज एक दोन गावकरी मठात हजर असते तर त्यांनी तुमचं नखही तुमच्या घरापर्यंत पोहचू दिलं नसतं.

*(सुमन समीरचा हात झटकते. समीर झाल्या प्रकारानं पुरता भांबावून गेला आहे. दोघांकडं बघत राहतो. सुमन पुजारी काकांना त्यांच्या खुर्चीवर बसवते.)*

सुमन - काका, बसा शांतपणे.

पुजारी - मी शांतच आहे. पण तू कशाला मधे पडलीस? शाळेत जायला उशीर नाही का होणार. प्रार्थनेची वेळ झालीय्.

सुमन - मला उशीर झाला तर मोरे मास्तर घेतील प्रार्थना. पण शिंगं उगारणारा हा सांड मंदिरात असेपर्यंत मी तुम्हाला एकटं सोडून जाणार नाही.

*(समीरला काय करावं ते उमगत नाही. काही क्षण दातानं नक्षं कुरतडत राहतो. नंतर खिसे तपासतो. मोबाईल बाहेर काढतो. प ोन लावण्याचा प्रयत्न करतो.)*

समीर - च्यायला, नेटवर्क सुद्धा मिळत नाही या गावात.

सुमन - ओ मिस्टर, कोण असाल ते, मठाच्या बाहेर गेल्याशिवाय मोबाईल काम करणार नाही.

*(समीर एक पाऊल मठाच्या बाहेर जातो. मोबाईल वर बोलणं सुरू करतो.)*

समीर - डॅड्, मी वाडीला पोहोचलो आहे. पण हा संकट मोचन महाराजांचा मठ नाही, बदमाश, गुंडांचा अड्डा आहे! इथल्या पुजाऱ्यानं मला थप्पड मारली. आणि आता म्हणतोय् मी हात उगारलाच नाही. मी त्याला चांगला धडा शिकवणार होतो तेवढ्यात

एका मुलीनं माझा हात पकडला.... डॅड तुम्ही हसताच काय? लवकर या. बरोबर पोलीस आणा त्या दोघांना अटक करून घेऊन जा.

सुमन - वडिलांना फोन केला त्या गुंडानं. येवू दे त्यांना. मी कुणाला घाबरत नाही.

*(त्याच वेळी समीर दोघांच्या समोर येवून हसत उभा राहतो.*

*क्षणभर अंधार.*

*नंतर उजेड.*

*स्थळ तेच. पात्र तीच. सुमन मूर्ती भोवती प्रदक्षिणा घालत आहे. पुजारी आपला जप करत आहे. डॅड अजुन कसे आले नाहीत. असा विचार करत समीर मठात चकरा मारत आहे. क्षणभरानं समीरचे वडील आणि त्यांचा पी.ए. धापा टाकत प्रवेश करतात.)*

डॅड - छेऽ छेऽ? टेकड्या चढायची सवयच संपली आहे.

*(त्याचवेळी समीर त्यांच्या समोर येतो. 'डॅड अशी हाक मारतो. डॅड त्याला थांब अशी खूण करतात.)'*

डॅड - (पी.ए. कडं वळून) येडेकर, तुला सांगतो, पुण्याला असतांना पर्वतीच्या पायथ्या पासून देवळापर्यंत एका दमात पळत जात असे मी.

पी.ए. - हो सर.

डॅड - हो काय? माझ्या बरोबर तू पळत होतास?..... आता बसल्या बसल्या लोकांचे प्रश्न सोडवण्यातच दमछाक होते. समीर तू कुणाबद्दल तक्रार करत होतास? (चष्मा काढून साफ करू लागतात.)

*(त्याचवेळी सुमन पाण्याचा ग्लास डॅडींच्या समोर धरते. डॅडी पाणी पिवून टाकतात. ग्लास परत करतात. सुमनला बघून)*

डॅड - थँक यू मॅडम? मॅडम, तुम्ही इथं?

सुमन - हो सर. मी याच गावात राहते. आमच्या शाळेच्या नव्या इमारतीची ग्रँट वाढवून द्या असा अर्ज घेवून मीच आले होते तुमच्याकडे.

डॅड - यस्, यस्! आत्ता आठवलं. तुम्ही शाळेची गरज उत्तम प्रकारे मांडली आहे. मी तुमचा अर्ज शिक्षण खात्याकडं पाठवला आहे. थोड्याच दिवसात उत्तर येईल.

सुमन - पण सर, इमारतीचं काम कसं चाललं आहे त्याची पाहणी करण्यासाठी एक अधिकारी पाठवीन असं म्हणाला होता तुम्ही.

डॅड - हो. म्हणालो होतो.(किंचित हसून) मॅडम, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात सेवा भावनेनं काम करणाऱ्यावर असं थोडसं दडपण टाकावंच लागतं. नाही तर कुणीही उठेल आणि म्हणेल 'मी अमुक करतोय तमुक करतोय, मला पन्नास लाख द्या, एक कोटी द्या?' तसं आम्हाला करता येत नाही. म्हणून पाहणी करावी लागते. आता मी स्वतःच इथं आलो आहे. इथलं काम उरकलं की शाळेच्या बांधकामाची पाहणी पण करू. समीर या मठाच्या पुजाऱ्याबद्दल तक्रार करत होतास. कुठायत ते पुजारी?

समीर - ते काय, मॅडमच्या मागं लपलेत.

*(पुजारी आणि डॅड एकमेकाकडं क्षणभर बघत राहतात. नंतर समीरचे वडील पुजारी काकांच्या पाया पडतात. पुजारी त्यांच्या खांद्याला धरून उभं करतात.)*

पुजारी - यशस्वी भव, आयुष्यमान भव, महाराज तुमचं कल्याण करोत.

डॅडी - समीर, हे पुजारीकाका नाहीत, आपल्या सगळ्यांचे बाप आहेत, दंडवते साहेब आहेत. अरे, पुण्याला असतांना मी यांच्या हाताखाली सिव्हिल ॲडमिनिस्ट्रेशनचे धडे गिरवले, म्हणून आज साताऱ्याचा असिस्टंट कलेक्टर झालेला पाहतोयस! आणि तू त्यांच्या बद्दलच तक्रार करत होतास? अरे माणसं ओळखायला कधी शिकणार? त्यांच्या पाया पड आणि माफी माग?

पुजारी - पाटील साहेब तरूण मुलाचं असं खच्चीकरण करू नका. आपला काळ वेगळा होता. कुणी 'अरे म्हटलं तर कां रे' असं उलटून विचारण्याची धमक आपल्यात नव्हती. पण

आजकालची मुलं 'अरे' म्हणणाऱ्याचा गळा धरून 'कारे मस्ती चढली कां तुला' असा दम भरायला कमी करणार नाहीत.

डॅडी - (समीरचा कान धरून) ऐक, ऐक, दंडवते साहेब तुझ्याबद्दल बोलतायत् आणि तू त्यांचीच तक्रार करत होतास. दंडवते साहेब, याला मोकळं सोडू नका. कर्वे गुरूजींनी सांगितलेला उपाय याच्याकडून नेटानं करून घ्या. आणि त्याला या गावातच राहू दे.

पुजारी - पण समीर तर म्हणत होता की तो रोज मोटर सायकलवरून अप्-डाऊन करणार आहे.

डॅडी - वेड लागलंय् त्याला.

समीर - डॅड, धिस इज नॉट फअर. मी साताऱ्याहून अप्-डाऊन केलं तर काय बिघडणार आहे? साताऱ्याहून तीस-पस्तीस किलोमीटरवर तर आहे ही वाडी!

डॅडी - तू मोटार सायकलवरून तीस -पस्तीस किलोमीटर इकडं येणार, इथलं काम संपलं की पुन्हा तीस-पस्तीस किलोमीटर घरी येणार, नो!! तू आमचा एकुलता एक मुलगा आहेस. तू घरी परतेपर्यंत जीव टांगणीला लागणार, आणि समजा यतां-जातां वाटेत तुला अपघात झाला तर तुझी आई हाय खाऊन मरून जाईल. नो! नो!!

समीर - डॅड्, मम्मीच्या काळजीचं कारण पुढे करून तुम्ही नेहमीच मला मागं खेचता, माझ्यावर दडपण टाकतां. ठीक आहे. मी राहीन पाटलांच्या निवासात.

डॅडी - दॅटस् लाइक अ गुड् बॉय! इथं राहायचं नाही अशा इराद्यानंच आला होतास, म्हणजे कपडे-लत्ते आणले नसशीलच. तुला काय काय पाहिजे ते तुझ्या मम्मीला कळव. माझा पी.ए. संध्याकाळपर्यंत त्या वस्तू तुला पोहचवण्याची व्यवस्था करील..... चला मॅडम तुमच्या बांधकामाचा प्रोग्रेस तपासू. दुपारपर्यंत मला ऑफ्रसात पोहोचलं पाहिजे.

*(संकट मोचन महाराज आणि पुजारी काका यांना नमस्कार करून समीरचे वडील, त्यांचा पी.ए. आणि सुमन निघून जातात. पुजारी काका समीर जवळ जातात, त्याच्या पाठीवर हात ठेवतात.)*

पुजारी - समीर, आई-वडिलांवर नाराज होऊ नकोस आणि शांत मनानं कर्वे काकांनी सांगितलेली सेवा करण्याचा संकल्प कर. सेवा आजपासूनच सुरू करणार का उद्यापासून?

समीर - आजपासूनच सुरू करतो. म्हणजे इथं राहण्याचा एक दिवस कमी होईल.

पुजारी - ठीक आहे. जपाची माळ आणली आहेस ना, ती महाराजांच्या पायाशी ठेव. मी सांगतो तसा संकल्प मनातल्या मनात म्हण 'संकट मोचन महाराज, तुम्ही दोनदा स्वप्नांत दर्शन दिलंत म्हणून, आणि कर्वे गुरूजींच्या सल्ल्याप्रमाणं मी आठ दिवस मंदिराला दहा प्रदक्षिणा घालण्याचा आणि मठात बसून तुमच्या मूर्ती समोर 'श्री स्वामी समर्थ' नामाचा दहा माळा जप करण्याचा संकल्प करतो आहे. या आठ दिवसांत मी मटण मच्छी खाणार नाही. त्याचप्रमाणं कुणाशी भांडण करणार नाही. तुमच्या आशिर्वादानं हा माझा संकल्प पूर्ण होऊ दे.'

समीर - पुजारी काका, हे दोन्ही संकल्प सकाळीच पूर्ण केले पाहिजेत असं काही बंधन आहे का?

पुजारी - छेऽछेऽ ! बंधनं काहीच नाहीत. आपण काय संकल्प केलाय, रोज मंदिराला दहा प्रदक्षिणा आणि रोज मूर्तीसमोर दहा माळा जप करणं. ते काम तू सकाळी, दुपारी, संध्याकाळी रात्री केव्हाही कर. आधी जप कर, नंतर प्रदक्षिणा घाल किंवा आधी प्रदक्षिणा घाल नंतर जप कर.

समीर - थँक यू सर?

*(समीर पुजारी काकाना नमस्कार करतो आणि मूर्तीसमोर बसून जप सुरू करतो. हळू हळू अंधार होतो.)*

**दृश्य ३**

*(स्थळ - मठ, वेळ सकाळ.  पुजारी काका मूर्तीला नमस्कार करून आपल्या जागेवर बसतात. जप सुरू करतात. क्षणभरानं सुमन, बापू, तात्या एका मागोमाग एक एक प्रवेश करतात, इतर एक दोन गावकरीही दिसतात. प्रत्येकजण गळ्यातली जप माळ महाराजांच्या पायाशी ठेवून डोकं टेकतात, माळ उचलून घेतात, पुजारी काकांच्या पाया पडतात, मठात बसून जप सुरू करतात. काही जण प्रदक्षिणा करतां करतां जप सुरू करतात. प्रत्येकजण जप, प्रदक्षिणा झाली की महाजारांच्या पाया जवळ ठेवलेल्या भांड्यातलं पळीभर तीर्थ पिऊन टाकतात, आणि निघून जातात. उरतात फक्त तात्या आणि बापू. ते दोघं आपल्या नेहमीच्या जागी बसलेले असतात.)*

तात्या - बापू, वाईच तमाखू काढा की.

बापू - आरं तुज्या? नेहमी मीच चंची खोलायची व्हय?

तात्या - माज्या परीस दोन बिघं ज्यादा जमीन हाय तुमच्या कडं. शिवाय बांधावर तंबाखूची रोपं पन् लावलिया तुमी. ती रोपं बी जोमानं वाढतायत्.

बापू - (चंची काढून चिमुटभर तंबाखू तात्याच्या हातावर टाकतो.) घ्ये लेका. पन् माज्या पिकाला नजर लावू नगस.

*(तंबाखू हातावर चोळत राहतात. फक्की मारतात. क्षणभरानं समीर मंदिरात प्रवेश करतो.)*

बापू - कोन पोरगा हायरं त्यो?

तात्या - सुमनताईची शाळा तपासायला साताराचे कलेक्टर आलं नव्हते कां? त्यांचा पोरगा हाय त्यो.

बापू - आरं तिच्या? थोरा मोठ्यांच्या पोरावरबी काय आफत आली म्हनायची?

तात्या - आफत न्हाई बापू. त्यो रातच्याला बोंबलत उठायचा म्हने. आईचं काळीज, धसका घेनारच की! तिनं एका बामणाचा सल्ला घेतला. त्यानं सांगितलं वाडीला जाऊन आठवडाभर महाराजांची सेवा करायला हवी. म्हणून आलाय् सेवा करायला.

बापू -	तात्या, तुलाच या बातम्या कुठून मिळत्यात रंऽ?

तात्या -	बातम्या न्हाई, सहज कानावर पडलं त्ये सांगतुया.......... पाटलांच्या निवासात खोली घेन्यासाठी आलावता. त्यो पोरगा.

बापू -	तू निवासात कशा पाई गेलावतास?

तात्या -	पाटलांकडून ईस रूपये उसने घेतले व्होते ते परत देन्यासाठी गेलोवतो. न्हाई तर निवासांत आपलं काय ठेवलंया?

बापू -	उसने कशासाठी? दारू पिन्यासाठीच ना?

तात्या -	न्हाई बा? सुमन ताईनी महाराजांची शपथ घातली तवा पास्नं दारूच्या थेंबाला बी शिवलो न्हाई म्या.

बापू -	समद्या गावावर अशी. क्रिपा ठेवा महाराज!!

*(दोघं बसल्या जागेवरून हात जोडतात, डोकं टेकतात. हळू हळू अंधार होत जातो.)*

## दृश्य-४

*(स्थळ- तेच, पात्र-तीच. वेळ संध्याकाळ. पुजारी काका आपल्या जागेवर बसले आहेत. जप करत आहेत. क्षणभरानं समीर प्रवेश करतो. महाराजांना आणि पुजारी काकांना नमस्कार करतो.)*

पुजारी - समीर, तू यावेळी इथं? अरे दिवस लहान झाले की सायं पूजा, आरती संध्याकाळी सहा वाजताच उरकली जाते.

समीर - ते मला माहित आहे. पण अगदी राहवेना म्हणून तुमचा सल्ला घेण्यासाठी आलो.

पुजारी - म्हणजे झालंय तरी काय? तुझ्या सेवेचे अजुन ३/४ दिवस तरी शिल्लक आहेत.

समीर - ते माझ्या लक्षांत आहे....... काका गांवकरी सांगतात की महाराज जवळच्या डोंगरातून या वाडीत आले.

पुजारी - तशी दंत कथा मी पण ऐकली होती. खरं-खोटं महाराजांना माहित. मी स्वतः कधी त्या डोंगराकडं गेलो नाही.

समीर - दिवसभर लोळत पडण्यापेक्षा, महाराज नक्की कुठून आले ते पहावं म्हणून मी त्या डोंगरावर गेलो. डोंगर माथ्यावर फिरतां फिरतां चार मोठे वृक्ष दिसले. त्या वृक्षांजवळ गेल्यावर कळलं त्या वृक्षांच्या मधोमध एक छोटी गुहा आहे. गुहे जवळ जाऊन बघितलं तर पाणी वर उसळतंय् असा आवाज ऐकू आला. मग मात्र मला गप्प बसवेना. मी धाडस करून गुहेत गेलो आणि थक्क झालो. कमरे इतक्या उंच शिळेवर महाराजांच्या पादुका दिसल्या, त्या शिळेखालून पाण्याची धार, खालच्या गोल दगडी कुंडात पडत होती. ते कुंड काठोकाठ भरलेलं होतं. पण शिळेखालून गोल कुंडात पडणारं पाणी, पुढे कुंठ जातं ते मात्र कळलं नाही.

पुजारी - समीर, तू स्वतःच्या डोळ्यांनी हे सगळं बघितलंस?

समीर - म्हणजे काय काका? मी पादुकांचे आणि कुंडाचे फोटो काढून आणलेत. (काकांना मोबाईलमधले फोटो दाखवतो.)

पुजारी - आश्चर्य आहे! कमाल आहे तुझी!! बेटा, तुझ्या डोक्यात काय चाललं आहे सांगशील?

समीर - काका, कुंडात पडणारं पाणी वायाच जात असेल तर ते पाणी नळानं गावात आणतां येईल, आणि वाडीची पाण्याची समस्या कायमची सुटेल?

पुजारी - पण समजा-मनांत शंका आली म्हणून विचारतो-वाडी मधल्या विहीरींना पाणी लागतं ते त्या कुंडातनं झिरपून आलेलं पाणी कशावरून नसेल.

समीर - ते भूगर्भ शास्त्रज्ञच सांगू शकेल. तो कुठं मिळणार.

पुजारी- अरे, तुझे वडील सातारा जिल्ह्याचं असि. कलेक्टर आहेत ना? त्यांच्या हाताखाली वेगवेगळ्या क्षेत्रातली तज्ञ मंडळी असणारच. त्यातल्याच एका दोघांना पाठवून द्या म्हणावं!

समीर - यस्! डॅड् नक्की काही तरी व्यवस्था करतोल.

पुजारी - समीर गावच्या पाटलाकडं जुन्या कागद पत्रांची दप्तरं आहेत. त्यातून काही संदर्भ मिळतायत का बघ!

समीर - काका, या सगळ्या कामात आपल्याला मदत करील असा एकादा तरूण मुलगा तुमच्या नजरेत आहे?

पुजारी - या गावांतली सगळी तरूण आणि मध्यम वयाची माणसं एकतर शतीच्या कामात गुंतलेली असतात किंवा रोजंदारीवर जातात. त्यामुळं तसा मुलगा........ हां, पण एक मुलगी आपल्याला मदत करू शकेल.

समीर - सुमन मॅडम?

पुजारी - हो. स्वभावानं खूप चांगली. बी.एड्. झालेली आहे. शाळेचं काम सुरू केलय् मुख्य म्हणजे वाडीतल्या गांवकऱ्यांच भलं व्हावं अशी कळकळ आहे तिला.

समीर - मॅडमची माझी ओळख करून द्याल?

पुजारी - कां? मुलीशी बोलायला घाबरतोस?

समीर - घाबरत नाही. पण पहिल्या दिवशी मी तुमच्यावर हात उगारला आणि मॅडमनी माझा हात वरच्यावर पकडला. तेव्हापासून माझ्याबद्दल.........

पुजारी - असल्या गोष्टी मनांत ठेवून वागणारी मुलगी नाही सुमन. तू असं कर, माझा रात्रीच्या जेवणाचा डबा घेवून येते. अरेच्या, आलीच की, नांव काढायचा अवकाश, सुमन हजर!

*(डबा घेऊन सुमन प्रवेश करते. तिच्या बरोबर एक मध्यमवयीन पुरूष आहे. त्याचं नांव शशांक पाटील, शशांक सुमनचा चुलत भाऊ आहे. दोघे पुजारी काकांना नमस्कार करतात. पुजारी दोघांना आशिर्वाद देतात.)*

पुजारी - आयुष्यमान भव, यशस्वी भव, शशांक तू मध्येच कसा काय आलास?

शशांक - बहिणीचं फर्मान आलं, शिक्षण खात्याकडून कॉलेजच्या प्रोजेक्टला पूर्ण संम्मती मिळालीय. तुझी कामं पूर्ण करण्यासाठी कधी येतोस ते कळव. पुण्याच्या ऑफिसची व्यवस्था लावून लगेच निघालो....... हे कोण?

समीर - सर, मी समीर पाटील, मी तुम्हाला ओळखतो. मी सातारच्या पॉलिटेक्नीकचा विद्यार्थी आहे. वॉटर मॅनेजमेंट आणि भूगर्भ शास्त्रज्ञ म्हणून तुम्ही कॉलेजमध्ये आला हाता. तुमची भूगर्भ शास्त्रावरची चारही लेक्चर मी ऐकली आहेत. तुमची दोन पुस्तकं पण आहेत माझ्याकडं. सर, तुम्ही फर्म चालवणं, पुस्तकं लिहिणं, कॉलेजात लेक्चर देणं, फर्मकडं आलेली कामं पूर्ण करणं....... इतकं सगळं कसं. सांभाळता?

शशांक - कोण, मी सांभाळतो? आपल्याला अनेक ठिकाणी नाचवणारी शक्ती वेगळीच असते. माझ्या बाबतीत ती शक्ती म्हणजे संकट मोचन महाराज आहेत. ते नाचवतील तसा मी नाचतो.

पुजारी - शशांक, तू पाटील काकांच्या 'भक्त निवास' मध्ये राहणार आहेस ना? समीर सुद्धा तिथंच उतरलाय्. त्याला वाडीतल्या लोकांची पाण्याची समस्या सोडवण्याचा उपाय सुचलाय्. तू त्याला मार्गदर्शन कर.

शशांक - काका, तुमची इच्छा म्हणजे महाराजांची इच्छा. शिवाय समीर माझा विद्यार्थी आहे. मी..........

*(त्याचवेळी सुमन एक डबा आणि तीन बशा घेऊन काकांजवळ येते.)*

सुमन - दादा आता चर्चा पुरे करा. काकाना वेळीच चार घास खाऊन घेऊ दे.

पुजारी - पोरी, किती काळजी घेशील माझी. आणि जे काय आणलंयस् ते आपण सगळेच खाऊ थोडं थोडं.

सुमन - आपल्या सगळ्यांना पुरेल एवढा नाश्ता घेऊन आलीय्. मी ....... ह्यांना मंदिराकडे येताना पाहिलं होतं.

शशांक - ह्यांना म्हणजे? त्यांना काही नांव, आडनांव आहे की नाही?

*(सुमन शशांकच्या खांद्यावर हलकी चापट मारते. सगळे हसतात. सुमन तिघांच्या बशीत नाश्ता घालून बशा तिघांना देते. समीर थोडी काऽकू करतो.)*

समीर - मॅडम, मला नाश्ता नकोय, मी पाटील काकूंना माझ्या आवडीची बिरडयाची उसळ करायला सांगितली आहे.

शशांक - बापरे, म्हणजे रात्री तुमच्या माझ्यात लढाई सुरू होणार. ढुम धडाम्.

*(सगळे मुक्तपणे हसतात. समीर सुमनच्या हातातून नाश्त्याची बशी घेतो.) (हळूहळू अंधार)*

**दृश्य ५ -**

*(आधीच्या दृश्यानंतर झालेला अंधार तसाच आहे. अंधारातून काही आवाज ऐकू येतात. 'नारळ फोडा की' .......... दगडावर घाव घातल्याचे आवाज.... ड्रिलिंग मशीनचे आवाज.....शशांकचा आवाज 'मेस्त्री, दोरीचं बंडल द्या'..... नळ टाकल्याचा आवाज....समीरचा आवाज........'सर,पंपाचं फिटींग झालय्. पंप ऑन करू कां?' शशांक-थांब! पाईप लाईनचा सपोर्ट ढासळलाय. तो नीट करू दे. तुकाराम, तो मोठा दगड लाव पाईपाच्या खाली...... शाब्बास! समीर आता पंप सुरू कर'..... पाईपमधून पाणी पडल्याचा आवाज. खूप टाळ्यांचा आवाज...... पाठोपाठ सुमन ताईचा विजय असो 'शशांक साहेबांचा विजय असो. 'समीर भाऊ की जय' हळू हळू सगळे आवाज विरत जातात. क्षणभरानं अंधार होतो.)*

**दृश्य ६ -**

*(स्थळ - मठ, वेळ- संध्याकाळ, पुजारी मठात जमलेल्या भक्तांसाठी आरतीचं ताम्हण घेवून उभे आहेत. आरती घेणाऱ्यात तात्या, बापू, समीर, सुमन आणि २/३ गावकरी स्त्री-पुरूष असतात. काका आरती घेवून पुढं जाणार तेवढ्यात काकांना चक्कर आल्यासारखं होतं. तात्या काकांना सावरतात. समीर काकांच्या हातातलं ताम्हण देवापुढे ठेवतो, काकांना त्यांच्या खुर्चीवर बसवतो.)*

समीर - काका, एकाएकी काय झालं?

पुजारी - अरे बाबा, माझ्या वयाला ऐंशी वर्ष पूर्ण झाली. थकलेलं शरीर किती वर्ष तग धरणार?..... सुमन कुठाय?

सुमन - (पुढं येत) मी इथंच आहे काका.

पुजारी - पोरी, तू शाळा खूप चांगली बांधून घेतली आहेस. अकरावीपर्यंत आहे, पण ती डिग्री कॉलेजपर्यंत वाढव. समीर तू तर या वाडीचा काया पालटच केला आहेस. पाणी योजना, डांबरो सडक, पीक योजना, पक्की घरं.... सरकार वीजपण पुरवणार आहे लवकर. माझ्या डोळ्या देखत हे घडलं याचं मला जास्त समाधान आहे.

समीर - काका, महाराजांच्या कृपेनं आणि तुमच्या आशिर्वादानंच हे सगळं घडलं. नाही तर आम्ही बसलो असतो आणखी डिग्री मिळवत, मित्रांसोबत सिनेमे बघत, रमी खेळत, किंवा परदेशी जाण्याची स्वप्नं बघत.

पुजारी - हं. नशिबात असतं ते होतंच राहतं. (समीर आणि सुमन दोघांचे हात धरून) समीर, सुमन, तुम्ही दोघं इतके दिवस एकत्र काम करताय्. मग तुम्ही दोघं लग्न कां करत नाही?

(समीर सुमन एकमेकांकडं बघतात, क्षणभर नजर चोरतात, पुन्हा बघतात.)

समीर - काका, आजपर्यंत माझ्यावर मुलीसारखं प्रेम केलंत, मार्गदर्शन केलंत, मी तुमच्या मनाविरुद्ध काही करेन का?

पुजारी - शाब्बास! समीर, तुझ्या वडिलांना फोन लाव.

समीर - (वडिलांना मोबाईल लावतो.) कमाल आहे. पहिल्या झटक्यात फोन लागला.

सुमन - दोन वर्षात आपल्या वाडीत खूप बदल झालेत. मोबाईलचा टॉवरही बदलला आहे.

समीर - हॅलोऽ. डॅड्, पुजारी काकांना तुमच्याशी बोलायचंय्, (फोन काकांच्याकडं देतो.)

पुजारी - हॅलो, पाटलाऽऽ, मी माझ्या मुलींच.....हो सुमनचं लग्न, तुझ्या मुलाशी ठरवलं आहे..... ऑ काय? नसत्या चौकश्या करू नकोस. चांगला मुहूर्त शोधून दोघांचं लग्न लावून दे..... हो म्हण. म्हणजे मी मरायला मोकळा. (बोलतां बोलतां पुजारी काकांच्या हाताला कंप सुटतो, फोन गळून पडतो.

पुजारी - सुमन, समीर, मला महाराजांच्या पायाजवळ न्या. (समीर-सुमन काकांना धरून महाराजांच्या मुर्तीसमोर नेतात. काका महाराजांच्या पायावर डोकं टेकतात. दोन मिनिटं झाली तरी काका काहीच हालचाल करत नाहीत ते बघून समीर आणि सुमन काकांना खांद्याला धरून त्यांच्या खुर्चीवर बसवतात. काकांचा निर्जीव हात एका बाजूला घसरतो. सुमन रडू लागते. मठात 'श्री राम जय राम, जय जय राम' चा घोष सुरू होतो. हळू हळू अंधार होत जातो.

## दृश्य - ७

(हळू हळू प्रकाश येतो. मठाच्या बाहेर गांवकऱ्यांच मोठा समुदाय जमला आहे. समुदाय दिसत नाही पण गावकऱ्यांचा गोंधळ ऐकू येतो. क्षणभरानं सुमन छोट्या बाळाला घेऊन मठाच्या दारात येते. टाळ्यांचा गजर सुरू होतो. क्षणभरानं तात्या उभा राहून लोकांना शांत करतो. सुमन जवळ जातो.)

तात्या - पोरी, लेकराला माज्याकडं दे.

सुमन - तात्या, बाळ लहान असला तरी खूप चळवळ्या आहे. तुम्हाला सावरतां येईल का?

तात्या - तून आन् जावई बापूंनी समद्या गावाला सावरलंत आन् मला तान्हं लेकरूं सावरतां येनार न्हाई व्हय? (सुमन बाळ तात्याकडे देत.)

सुमन - तसं नाही तात्या मला...

तात्या - तसं न्हाई मंग कस? तुज्या आन् समीर भाऊंच्या लग्नाच्या टायमाला तुज्या बाच्या जागी मला उबं केलंस आन् आता तान्या पोराला कसं सांबाळावं ते मला शिकवतियास?

सुमन - तात्या रागावूं नका. मला तुमची पण काळजी वाटतीय्. या वयांत.....

तात्या - आगं माजी सत्तरी बी उलटली न्हाई. आन् तुजं हे पोरगं साळंत कालिजात जाया लागलं, एमे, पिमे होवून कलेक्टर झालेलं बघितल्या शिवाय म्या मरणार न्हाई! .......पोरी तुजं लेकरू लई चतरं हाय. माज्या हरेक बोलन्यावर हूऽहूऽ असा हुंकार देतुया, पयल्या पुजारी काका सारका!!

सुमन - म्हणूनच मी सगळ्या मैत्रिणींना सांगते की पुजारी काकाच माझ्या पोटी आले आहेत.

तात्या - व्हय्! व्हय्! पोरी समीर भाऊ येत्यात. लेकराला घेवू त्यांच्या संग उबी ऱ्हा. समद्या गावाला डोळं भरून बगू द्या, लक्ष्मीनारायणाचा जोडा!!

(मुलाला एकदा छातीशी धरून नंतर मूल सुमन कडं देतो. हातात एक माईक घेवून समीर गावकऱ्यांसमोर येतो. गावकरी टाळ्या वाजवून त्याचं स्वागत करतात. समीर बोलायला सुरुवात करतो.)

समीर - माझ्या गांवकरी बंधू भगिनींनो, आपल्या पुजारीकाकांना जाऊन वर्ष दिड वर्ष झालं. या काळात मला जमेल तेंव्हा, जमेल तशी संकट मोचन महाराजांची पुजा अर्चा करत होतो. नव्या पुजारी काकांचा शोध पण चालू होता. सुदैवानं सातारचे नित्सुरे भटजो, आपले नवे पुजारी म्हणून वाडीत येवून राहायला तयार झाले.

तात्या - तित सुरे...... नित सुर्वे.... बापू, समीर भाऊ कसल्या कसल्या नावाची मानसं घिवून येत्यात? ध्येनात कसं नांव ऱ्हानारं?

बापू - आरं गप्! त्या बामणाचं नांव कशाला ध्येनात ठिवायचं? आपुन आपलं पुजारी काकाच म्हनायचं!

तात्या - हां. त्येबी खरं हाय् म्हना!

समीर - आणखी एक गोष्ट. दंडवते काकांनी संकट मोचन महाराजांची आणि आपल्या सगळ्यांची तीस वर्षांपेक्षा जास्त सेवा केली. फार बोलणं नाही, सतत जप करत राहणं, महाराजांची सेवा करणं, पीक-पाण्याच्या बाबतीत मार्गदर्शन करणं, कुणी काही आणून दिलं तर कौतुकानं खाणं, नाही तर तांदुळाच्या कण्या उकडून खाणं, एकाद्या संतासारखं वागणं होतं पुजारी काकांचे! म्हणून आपण सर्वानुमते ठरवूया की आजपासून आपली वाडी 'संताची वाडी' या नावाने ओळखली जाईल. आपल्या सर्वांतर्फे दंडवते काकांना तीच श्रद्धांजली देऊ या. (गावकरी 'संताची वाडी' असं ओरडत, पागोटी, टोप्या वर उडवतात, नाचू लागतात. स्त्रिया टाळ्या वाजवून संम्मती प्रकट करतात. नवे पुजारी त्या गोंधळातच 'स्वस्ती वचन' म्हणू लागतात. हळू हळू अंधार होत जातो.

✻ समाप्त ✻

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की पाच कोटी नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि

त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष

ई साहित्य प्रतिष्ठान